दि. २२/१२/२२

(१) म.२१.पु.पा.क्र.०१

# धारावी किल्ल्यावर सीसीटीव्हीची नजर

## वाढते गैरप्रकार रोखण्यासाठी निर्णय

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**



भाईंदरच्या जंजिरे धारावी किल्ल्यावर दारूपार्ट्यांसारखे गैरप्रकार मागील काही दिवसांपासून वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. या पार्श्वभूमीवर आता किल्ल्याच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून, त्याद्वारे गैरप्रकार रोखण्याचा व हुल्लडबाजांवर लक्ष ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसा प्रस्तावही उद्यान विभागाने संबंधित विभागाला सादर केला आहे.

मिरा-भाईंदर पालिका हद्दीतील उत्तन समुद्रकिनाऱ्याला लागून ऐतिहासिक जंजिरे धारावी किल्ला आहे. हा किल्ला अनेक वर्षे दुर्लक्षित राहिल्याने त्याची दुरवस्था झाली आहे. किल्ल्याच्या संवर्धनासाठी शिवप्रेमींकडून स्वच्छता मोहिमा व इतर उपक्रम राबवले जातात. यावेळी दारूच्या बाटल्यांचा खच व इतर वस्तू आढळून आल्या होत्या. तसेच किल्ल्यावर मद्यपान व गांजा ओढताना काही जण आढळल्याने त्यांच्यावर गुन्हाही दाखल करण्यात आला होता. हे प्रकार वारंवार होत असल्याने इतिहासप्रेमींकडून नाराजी व्यक्त केली जात होती.

मिरा-भाईंदर पालिका प्रशासनाकडून किल्ल्याच्या संवर्धनाचे काम आगामी काळात हाती घेतले जाणार आहे. परंतु, किल्ल्यावरील वाढते गैरप्रकार पालिकेसाठी डोकेदुखी ठरत आहेत. किल्ल्याचे पावित्र्य जपण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी शिवप्रेमींकडून केली जात आहे. या पार्श्वभूमीवर, आता किल्ल्याच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय घेत, तशा मागणीचा प्रस्ताव संबंधित विभागाला सादर करण्यात आल्याची माहिती पालिका उपायुक्त संजय शिंदे यांनी दिली. प्रशासनाने किल्ल्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्यास हुल्लडबाजांवर वचक बसेल, असा विश्वास शिवप्रेमींनी व्यक्त केला आहे.

### तपासणीसाठी पथक नेमावे

जंजिरे धारावी किल्ल्यावर अनेक जण मद्यपान करताना आढळले आहेत. नववर्षाचा जल्लोष अवघ्या काही दिवसांवर आला असल्याने, त्यावेळी पर्यटक मोठ्या प्रमाणावर घराबाहेर पडणार आहेत. या पार्श्वभूमीवर, ३१ डिसेंबर ते १ जानेवारी दरम्यान किल्ल्यावर दारूपार्ट्यांसारखे प्रकार रोखण्यासाठी पर्यटकांची तपासणी करावी, त्यासाठी तपासणी केंद्र उभारून विशेष पथक नेमावे, अशी मागणी शिव समर्थ प्रतिष्ठानने पोलिस आयुक्तांकडे केली आहे.

---

(२) म.२१.पु.पा.क्र.०१

## वालिव येथे गुंडगिरी

**वसई :** वसईच्या वालीव, नाईक पाडा येथे वैयक्तिक वादातून गोळीबाराची तसेच तलवारीने एका व्यक्तीच्या हाता-पायावर वार केल्याची घटना मंगळवारी सायंकाळी घडली असून यात तो जखमी झाला आहे. नाईक पाडा येथे राहणारे हरजित सिंग ऊर्फ दादू चारचाकी वाहनातून जात असताना, नाईक पाडा येथे दुसऱ्या चारचाकीने आलेल्या तीन व्यक्तींनी हरजितसिंग यांच्यावर तलवारीने वार केले, तसेच त्यातील एकाने एक गोळी झाडली. या घटनेत हरजितसिंग जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. हा जीवघेणा हल्ला डुकरावरून झालेल्या वादातून झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या हल्ल्यानंतर तिघेही हल्लेखोर फरार झाले असून वालिव पोलिसांनी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे.

---

(३) म.२१.पु.पा.क्र.०१

## हॉटेलवर कारवाई

**मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदरमध्ये एका हॉटेलवर शरीरविक्रयासाठी तरुणी पुरवल्या जात असल्याने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडून कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी हॉटेलच्या मॅनेजरसह इतर दोन कर्मचाऱ्यांवर काशिमिरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत माहिती मिळाल्यानंतर, पोलिसांच्या पथकाने हॉटेलमध्ये बोगस ग्राहकाला पाठवून छापा टाकला. त्यावेळी हॉटेलमधील कर्मचाऱ्यांनी या बोगस ग्राहकाला शरीरविक्रयासाठी दोन तरुणी दाखवून, त्याच्याकडून पैसे स्वीकारल्याचे निदर्शनास आले. हॉटेलमधील कर्मचाऱ्यांकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर मॅनेजर श्रीनिवास शेट्टी, कर्मचारी बिलप्रसाद गुप्ता व इंद्रदेव यादव यांच्याविरोधात काशिमिरा पोलिस ठाण्यात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

(४) म.२१.पु.पा.क्र.०१

## सहकार मंत्री सावे शनिवारी वसईत

**वसई :** राज्याचे सहकारमंत्री अतुल सावे यांचा शनिवारी वसई विकास बँकेतर्फे सत्कार करण्यात येणार आहे. सहकारमंत्री झाल्यावर ते प्रथमच वसईत येत आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर असतील, तर आमदार मनीषा चौधरी आणि आमदार राजेश पाटील प्रमुख अतिथी असतील. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष जगदीश राऊत हे असतील. वसई, देवतलाव येथील फादर बर्नाड भंडारी सभागृहात शनिवारी दुपारी ३.३० वाजता हा सत्कार सोहळा होईल, अशी माहिती वसई विकास बँकेचे अध्यक्ष आशय राऊत यांनी दिली आहे. सहकारमंत्री सत्काराला काय उत्तर देतात, त्याकडे वसई-विरारमधील सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

दि. २२/१२/२२.

(५) म.टा. पु.भाग नं.०१

## मार्शल आर्ट स्पर्धा

**मिरा-भाईंदर :** राज्य सरकारच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून क्रीडा व युवक संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व मिरा-भाईंदर महापालिकेच्या सहकार्याने मिरा-भाईंदरमध्ये राज्यस्तरीय सिकई मार्शल आर्ट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. पालिकेच्या रामदेव पार्क येथील धम्मसम्राट अशोक बुद्धविहार येथे २२ ते २४ डिसेंबर या कालावधीत ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षांखालील वयोगटांतील मुलांना सहभागी होता येईल.

(६) लोकसत्ता पु.भाग नं.०२

## आरोपी चालकाची नार्को चाचणी करणार

**वसई :** महामार्गावरील चालत्या वाहनात महिलेचा विभयभंग प्रकरणाचे गूढ अद्याप उलगडलेले नाही. त्यामुळे या प्रकरणातील सत्य शोधून काढण्यासाठी आरोपी चालक आणि फिर्यादी महिलेची नार्को चाचणी केली जाणार आहे. यासाठी न्यायालयाची परवानगी मागण्यात आली आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर खासगी इको गाडीतून प्रवास करणाऱ्या २० वर्षीय विवाहित महिलेची १० महिन्यांची मुलगी खिडकीतून खाली पडल्याने तिचा मृत्यू झाला होता. गाडीतील चालक आणि इतर सहप्रवाशांनी विनयभंग केल्याने मूल खाली पडले असा आरोप महिलेने केला होता. याप्रकरणी चालक विजय कुशवाह (६०) आणि अन्य ३ अनोळखी प्रवाशांविरोधात विनयभंग आणि हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तपास गुन्हे शाखा ३ कडे सोपविण्यात आला आहे. पोलिसांनी वाहनातील एकूण ४ प्रवाशांची ओळख पटवली आहे. सर्व प्रवाशांनी विनयभंग केल्याच्या आरोपावर महिला ठाम आहे. तर चालक आणि इतर प्रवाशांनी त्याचा इन्कार केला आहे. हा सर्व प्रकार ३ मिनिटात झाला. परस्परविरोधी दावे, कमी वेळ आणि एकूण परिस्थिती पाहता पोलिसांना घटनाक्रम जुळवता येत नाही. यासाठी आता पोलिसांनी आरोपी तसेच फिर्यादी महिलेची ब्रेन मॅपिंग, नार्को आणि लाय डिटेक्टर चाचणी करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे यांनी दिली आहे.

(७) लोकसत्ता पु.भाग नं.०३

# राज्य सरकारविरोधात उद्या मोर्चा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** काही दिवसांपासून राज्यपालांकडून महापुरुषांबद्दल बेताल वक्तव्य केले जात असल्याने याच्या निषेधार्थ फुले-शाहू, आंबेडकर, विचारमंचच्या वतीने शिंदे-फडणवीस सरकारच्या विरोधात पोलीस उपायुक्त यांच्या कार्यालयावर शुक्रवारी सकाळी ११ वाजता धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

काही दिवसांपासून भाजपच्या गोटातील मंत्री आणि महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी केलेल्या वक्तव्यांमुळे बहुजन समाजात असंतोष निर्माण होत आहे. यामुळे वसई-विरारमधील संविधानप्रेमींतर्फे या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. यात सर्व पक्षांना फुले-शाहू, आंबेडकर, विचारमंचच्या वतीने सामील होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दि. २२/१२/२२

① लोकसत्ता पु. पान नं. ०७

# यंदा ख्रिसमस कार्निव्हल जल्लोषात

लोकसत्ता वार्ताहर

वसई : मागील वर्षी करोनाच्या संकटामुळे वसईच्या धर्मप्रांतात ख्रिसमस कार्निव्हल रद्द केला होता. मात्र यंदाच्या वर्षी नाताळनिमित्ताने ख्रिसमस कार्निवल मोठ्या जल्लोषात साजरा केला जाणार आहे.

वसईत साजरा होणारा नाताळ सण हा केवळ धार्मिक सण म्हणून साजरा न होता पर्यावरण प्रबोधन, संस्कृती संवर्धन, सामाजिक उपक्रम अशा विविध अंगाने साजरा केला जातो.

> दरवर्षी उत्तर वसईत नाताळनिमित्ताने ख्रिसमस कार्निवलचे आयोजन करण्यात आले आहे. यातून सामाजिक सलोखा जपला जावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत. तसेच सध्या स्थितीतील निर्माण होत असलेल्या प्रश्नांवर समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न होत आहे.
> **–जॉय फरगोस,** सामाजिक कार्यकर्ते, गास वसई.

विशेष म्हणजे या सणाच्या निमित्ताने विविध ठिकाणच्या भागात शोभायात्रा काढल्या जातात. याच पार्श्वभूमीवर नाताळची तयारी म्हणून उत्तर वसई मध्ये भव्य असे ख्रिसमस कार्निव्हलचे आयोजन करण्यात आले आहे.

लहान सरगोडी सामाजिक संस्था गास यांच्या मार्फत याचे नियोजन करण्यात येत असून गुरुवारी सायंकाळी ६ वाजता या कार्निवलची सुरुवात होणार आहे. या कार्निव्हलमध्ये नाताळ सणाचा देखावा, वसईतील पारंपरिक बँन्ड, ख्रिसमस कँरल, तीन राजे, बाळ येशूचा पाठलाग करणारा राजा हेरोद, मेंढरासह सहभागी झालेले मेंढपाळ, पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेले आबालवृद्ध असे या कार्निव्हलचे स्वरूप असणार आहे.

दोन वर्षे नाताळ सण अगदी साधेपणात गेला होता मात्र आता सर्वकाही सुस्थितीत असल्याने वसई धर्मप्रांतात नाताळचा सण मोठ्या उत्साहात साजरा करणार असल्याची प्रतिक्रिया ख्रिस्ती बांधवांनी दिली आहे.

② सकाळ पु. पान नं ०३.

# कोरोना उद्रेकानंतर सतर्कता

## महाराष्ट्रात कृती दल; केंद्राकडून खबरदारी घेण्याच्या सूचना


सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. २१ : चीनसह अन्य काही देशांत कोरोना विषाणूचे रुग्ण पुन्हा आढळून येत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य आणि मुंबईत सतर्कता बाळगण्याची गरज असल्याचे मत वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. राज्यात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कृती दल गठित करून केंद्र सरकारबरोबर समन्वय ठेवून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

चीन आणि अमेरिकेत कोविड रुग्ण वाढत आहेत. ओमिक्रॉनच्या नवनव्या व्हेरिएंटमुळे ही समस्या उद्‌भवली आहे. केंद्र सरकारही चीनमध्ये वाढत्या कोविड प्रकरणानंतर सतर्क झाले आहे. बुधवारी (ता. २१) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारची उच्चस्तरीय बैठक झाली. सरकारने सध्या कोणतेही निर्बंध जाहीर केलेले नाहीत; पण खबरदारी म्हणून नागरिकांना सूचना दिल्या आहेत. गर्दीच्या ठिकाणी नागरिकांना मास्क आणि बूस्टर डोस लागू करण्यास सांगितले आहे.

### » नवीन रुग्णसंख्या ३० टक्क्यांनी कमी

राज्यात कोविडचे प्रमाण कमी होत असनू, या आठवड्यात मागील आठवड्याच्या तुलनेत नवीन रुग्ण संख्या ३० टक्क्यांनी कमी झाली आहे. तसेच प्रयोगशाळा पॉझिटिव्हीटी दर ०.२९ टक्क्यांनी कमी झाला आहे. राज्यातील अकोला, पुणे, नगर आणि जळगाव या जिल्ह्यांचा हाच दर १ पेक्षा अधिक आहे. राज्यात गेल्या आठवड्यात १६ कोविड रुग्ण रुग्णालयात दाखल झाले होते. त्यापैकी ८ रुग्णांना आयसीयूची गरज लागली. राज्यात सध्या १३५ सक्रिय रुग्ण आहेत.



चीनचे नवीन वर्ष जानेवारी महिन्यात आहे. डिसेंबरअखेरपासून फेब्रुवारीपर्यंत त्यांचा प्रवास वाढतो. शिवाय आंतरराष्ट्रीय सीमा खुल्या असल्याने जास्त चिंता आहे. जर कोणताही नवा व्हेरिएंट आला तर चिंता वाढण्याची शक्यता आहे. हा नवा व्हेरिएंट किती गंभीर आहे, किती पसरू शकतो यावर अभ्यास झाला पाहिजे; पण भारतांत लसीकरण झाले आहे. त्यातून 'हर्ड इम्युनिटी'ही तयार झाली आहे. त्यामुळे आता गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरण्याची गरज आहे, असे वैद्यकीय तज्ज्ञ सांगतात.

दरम्यान, आज राज्यात ३० नवीन रुग्णांचे निदान झाले आहे. तर मुंबईत ८ कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे.

> गर्दी पूर्णपणे टाळता येणार नाही, पण आपल्याला काळजी घेणे गरजेचे आहे. हाय रिस्क ग्रुपने बूस्टर डोसची मात्रा घेतली पाहिजे. पहिल्यासारखी परिस्थिती येणार नाही. टाळेबंदी करण्याची गरज पडणार नाही. लसीकरण, हर्ड इम्युनिटी या सर्वांमुळे नक्कीच फायदा होईल.
> **- डॉ. माला कनेरिया,** संसर्गजन्य रोगतज्ज्ञ

> भारतात कोणताही नवा व्हेरिएंट नाही. सरकारकडून हाय अलर्ट आला आहे. कोविड पॉझिटिव्ह आल्यास जिनोम सिक्वेन्सिंग करण्यास सांगितले आहे. जिनोम सिक्वेन्सिंगसाठी सर्व प्रयोगशाळांना सूचना दिल्या आहेत. सर्दी, खोकला, ताप असे आजार असल्यास मास्क घालावे. बूस्टर डोस घेणे आवश्यक आहे.
> **- डॉ. गौतम भन्साळी,** समन्वयक खासगी कोविड- १९ रुग्णालय

# मुख्यमंत्र्यांच्या भूखंड घोटाळ्यावरून विरोधकांनी ईडी सरकारला घेरले!

नागपूर, दि. २१ (प्रतिनिधी) – मुख्यमंत्र्यांच्या कथित भूखंड घोटाळ्यावरून विरोधी पक्षाने आज विधिमंडळात आणि विधिमंडळाबाहेरही सलग दुसऱ्या दिवशी 'ईडी' सरकारला घेरले. नागपूरमधील एनआयटीच्या भूखंडांचे एकाच व्यक्तीला कवडीमोल भावाने वाटप करणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी पुन्हा एकदा लावून धरली. या घोटाळ्याचा पुरावाच विरोधक सभागृहात मांडू लागल्याचे पाहून सत्ताधारी सदस्यांचे धाबे दणाणले. त्यांनी सभागृहात धिंगाणा घातला. परिणामी या मुद्द्यावरून विधान परिषदेचे कामकाज तीन वेळा तहकूब करावे लागले. विरोधकांच्या या आक्रमकतेमुळे विधानसभेतही सत्ताधाऱ्यांनी हा मुद्दा मांडण्यात व्यत्यय आणला.

विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासानंतर विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी नियम २८९ अन्वये हा भूखंडाचा ▪ पान ८






*मुख्यमंत्री शिंदे हे राजीनामा देत नाहीत तोपर्यंत हा मुद्दा लावून धरणारच असा इशारा विरोधकांनी विधान भवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन करत दिला. 'भूखंडाचे श्रीखंड खाणाऱ्या ईडी सरकारचा निषेध असो', 'खोके घेऊन भूखंड ओके करणारे मुख्यमंत्री राजीनामा द्या' अशा घोषणा त्यांनी दिल्या. विरोधी पक्षनेते अजित पवार, अंबादास दानवे, शिवसेना नेते आदित्य ठाकरे, नाना पटोले आंदोलनात सहभागी झाले.*

▪ मुख्यमंत्र्यांनी तातडीने राजीनामा द्यावा : आदित्य ठाकरे / पान ३

# मुख्यमंत्र्यांच्या भूखंड घोटाळ्यावरून विरोधकांनी ईडी सरकारला घेरले!

*(पान १ वरून)* मुद्दा उपस्थित केला. या भूखंड वाटपाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सुनावणीच्या नोंदी आणि नागपूर सुधार प्रन्यासचे अध्यक्ष मनोजकुमार सूर्यवंशी यांनी त्या वाटपासंदर्भात मांडलेले मत याचे पुरावेच दानवे यांनी सभागृहासमोर मांडण्यास सुरुवात केली. त्यामुळे विरोधी पक्षाचे सदस्य घाबरले. त्यांनी कधी गोंधळ घालत, तर कधी घोषणा देत दानवे यांच्या भाषणात व्यत्यय आणण्यास सुरुवात केली. त्यामुळे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सभागृहाचे कामकाज पंधरा मिनिटांसाठी तहकूब केले.

सभागृह पुन्हा सुरू झाले तेव्हाही सत्ताधारी पक्षाचे सदस्य चंद्रकांत पाटील, प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, राम शिंदे आदींनी गोंधळ माजवला. विरोधी पक्षाचे सदस्य ॲड. अनिल परब, विलास पोतनीस, सचिन अहिर, मनीषा कायंदे, सुनील शिंदे, आमशा पाडवी, काँग्रेसचे भाई जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे एकनाथ खडसे यांनीही त्यांना चोख उत्तर दिले. चर्चा झालीच पाहिजे असा आग्रह त्यांनी धरला. सभागृहात गदारोळ झाल्याने कामकाज दुसऱ्यांदा तहकूब करावे लागले.

मध्यंतरानंतर कामकाजाला पुन्हा सुरुवात झाली तेव्हाही विरोधकांनी भूखंड वाटप मुद्द्यावर चर्चेचा आग्रह कायम ठेवला तर सत्ताधारी त्यांना विरोध करत होते. एकदा एका विषयावर चर्चा झाली तर ती परत होत नाही, हे सभागृहाच्या नियमाविरुद्ध आहे. त्यासाठी नियम स्थगित करावा लागतो आणि तशी नोटीस एक दिवस आधी द्यावी लागते, असा मुद्दा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडला. त्यावर सभापती डॉ. गोऱ्हे यांनी आज सकाळी झालेल्या गटनेत्यांच्या बैठकीतच २८९ बाबत ठरले होते याची आठवण करून दिली. शिवसेना सदस्य आमदार ॲड. अनिल परब यांनी त्यावर नियम स्थगित करण्याचा अधिकार उपसभापतींचा आहे, उपमुख्यमंत्र्यांचा नाही असे स्पष्ट केले.

या गोंधळातून मार्ग काढण्यासाठी उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सत्ताधारी आणि विरोधकांना आपल्या दालनात बोलवले. त्यानंतर संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी या भूखंड वाटप मुद्द्यावर आमदार अनिल परब हे एकटेच बोलतील असे सभागृहाला सांगितले. आमदार परब यांनी भूखंड वाटपात झालेल्या घोटाळ्याची वस्तुस्थिती सभागृहात मांडली. राजा चुकला तर राज्याचे नुकसान होते आणि ते होऊ नये म्हणून आम्ही २८९ अन्वये हा मुद्दा मांडतोय असे त्यांचे बोलणे सत्ताधारी सदस्यांना चांगलेच झोंबले. मुख्यमंत्र्यांनी भूखंड वाटप करताना घेतलेल्या सुनावणीच्या नोंदीच सभागृहात सादर करतोय असे आमदार परब म्हणताच सत्ताधारी सदस्यांनी उभे राहून घोषणाबाजी सुरू केली. अध्यक्षांच्या आसनासमोर येऊन त्यांनी घोषणा दिल्या. त्यामुळे तालिका सभापती नरेंद्र दराडे यांनी सभागृहाचे कामकाज तिसऱ्यांदा तहकूब केले. सभागृह पुन्हा सुरू झाल्यानंतर उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी वरील विषय हा कामकाजात सहभागी नसल्याने तो अमान्य केला जात असल्याचे सांगितल्यानंतर सत्ताधारी पक्षाने सुटकेचा निःश्वास सोडला.

विधानसभेतही विरोधी पक्षाने हा भूखंड वाटप घोटाळा उपस्थित केला असता सत्ताधारी सदस्यांनी त्याला विरोध केला. त्यामुळे विधानसभेत त्यावर अधिक चर्चा होऊ शकली नाही.

## मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्यापर्यंत मुद्दा लावून धरणार

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राजीनामा देत नाहीत तोपर्यंत हा मुद्दा लावून धरणारच असा इशारा विरोधकांनी विधान भवनाच्या पायऱ्यांवर जोरदार घोषणाबाजी करून दिला. 'भूखंडाचे श्रीखंड खाणाऱ्या ईडी सरकारचा निषेध असो', 'खोके घेऊन भूखंड ओके करणारे मुख्यमंत्री राजीनामा द्या' अशा घोषणा त्यांनी दिल्या. यावेळी विधिमंडळातील विरोधी पक्षनेते अजित पवार आणि अंबादास दानवे, काँग्रेसचे नाना पटोले, अशोक चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे जयंत पाटील, छगन भुजबळ, शिवसेना आमदार अजय चौधरी, सुनील राऊत, रवींद्र वायकर, सुनील प्रभू, विलास पोतनीस, आमशा पाडवी, मनीषा कायंदे, सचिन अहिर, काँग्रेसचे भाई जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्ष व मित्रपक्षांचे आमदार उपस्थित होते.

## ...तर मुख्यमंत्र्यांकडून अनेक गुन्हे घडतील : आव्हाड

नागपूर सुधार प्रन्यासच्या भूखंडांसंदर्भात काही माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली नसल्याचे मुख्यमंत्र्यांकडून सांगण्यात आले. परंतु काम करताना सर्वंकष माहिती ठेवूनच निर्णय घ्यावे लागतात. नाहीतर मुख्यमंत्र्यांकडून असे अनेक गुन्हे घडतील, अशी टीका माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी केली. कॅगच्या आक्षेपानंतर हे भूखंड प्रकरण न्यायालयात गेले. गिलानी समितीने भूखंड देण्यास नकारात्मक शिफारस केली. एनआयटीच्या दोन सभापतींचा शेराही नकारात्मक आहे. न्यायालयात प्रकरण असतानाही मुख्यमंत्री यांनी भूखंड कमी दरात देण्याचे आदेश दिले. आता मुख्यमंत्री म्हणतात अधिकाऱ्यांनी प्रकरण न्यायालयात असल्याची माहिती समोर आणली नाही. मग उद्या त्यांच्या समोर अधिकाऱ्यांनी एखादी फाइल ठेवली तर मिरज क्षेत्रही कर्नाटकला देऊन टाकतील आणि म्हणतील, हे क्षेत्र महाराष्ट्रात आहे, याची माहितीच दिली नाही, असा टोला आव्हाड यांनी लगावला. मुख्यमंत्री या प्रकरणात अडकले आहे. परंतु अध्यक्षांच्या आडून चर्चा टाळण्यात येत आहे. हा लोकशाहीचा खून असल्याची टीकाही त्यांनी केली.

दि. २२/१२/२२.

(१७) लोकमत पु. पान क्र ०३.

# भाईंदरच्या राई-मुर्धा येथील मेट्रो कारशेड उत्तनला जाणार

## चार-पाच हजार कोटी खर्च वाढणार : मोरवा रस्ता होणार रुंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदरच्या राई-मुर्धा गावादरम्यान होणारी मेट्रो कारशेड ही उत्तन येथील सरकारी जागेवर उभारली जाणार आहे. या मेट्रोचा लाभ उत्तनवासीयांनाही होणार आहे. मात्र, कारशेड पुढे नेल्याने चार ते पाच हजार कोटींचा खर्च वाढणार आहे. तर मुर्धा-मोरवा येथील रस्ता ३० मीटर इतकाच रुंद केला जाणार असल्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे झाला असल्याची माहिती आमदार प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

भाईंदरच्या राई-मुर्धादरम्यान विकास आराखड्यातील ३० मीटर रुंद रस्ता करण्यास बाधित लोकांनी विरोध चालवला होता. रस्त्याचे कामही बंद पाडल्याने रस्त्याची दुरवस्था झाली. नंतर, राई-मुर्धादरम्यान प्रस्तावित मेट्रो कारशेडला स्थानिकांच्या एका संघटनेमार्फत विरोध चालवला आहे. प्रस्तावित कारशेड आरक्षणाविरोधात लोकांनी हरकती घेतल्या आहेत.

सरनाईक यांना संघटनेमार्फत शिष्टमंडळ भेटल्यानंतर त्यांनीही कारशेड हलवण्याची मागणी चालवली होती. नागपूर येथील सध्या सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात सरनाईक यांनी मेट्रो कारशेडचा मुद्दा उपस्थित केला होता.

गोंधळामुळे त्यावर चर्चा न झाल्याने आ. सरनाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन कारशेड उत्तन येथे हलवण्याची मागणी केली असता, ती त्यांनी मान्य केली.

### डोंगर फोडून मेट्रो कारशेड

भाईंदरच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत येणारी मेट्रो आता उत्तनपर्यंत जाईल. परिसरातील ग्रामस्थांना मेट्रोचा फायदा होईल. शिवाय, पर्यटन वाढेल. मेट्रो पुढे नेण्यासाठी व उत्तन येथे कारशेड करण्यासाठी सरकारवर अतिरिक्त ४ ते ५ हजार कोटींचा खर्च होणार आहे. उत्तन येथे सरकारी जमिनीवर डोंगर फोडून मेट्रो कारशेड बनेल. मेट्रो उत्तनपर्यंत जाणार असल्याने मुख्य रस्ता ३० मीटर इतका रुंद करावा लागणार आहे.

स्थानिकांचा विरोध असल्याने मेट्रो कारशेडचे आरक्षण रद्द केले जाणार आहे. आता उत्तन येथे कारशेड करण्याबाबत एमएमआरडीए नवीन प्रस्ताव तयार करेल व नगरविकास विभागाकडे पाठवेल.

मुख्यमंत्र्यांनी तसे आदेश दिले आहेत, अशी माहिती सरनाईक यांनी दिली. मेट्रो कारशेडबाबत भूमिपुत्रांच्या वेळोवेळी बैठका घेऊन त्यांना पूर्ण पाठिंबा दर्शवला होता. कारशेडविरोधात सातत्याने सरकारकडे मागणी चालवली होती. मुख्यमंत्र्यांनीही स्थानिक भूमिपुत्रांच्या बाजूने निर्णय द्यावा, यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आल्याचे आ. सरनाईक यांनी या वेळी सांगितले.

(१८) पुढारी पु. पान नं. ०२.

# लॉजिंग ॲण्ड बोर्डिंगवर कारवाई

## दोन पीडित मुलींची सुटका

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील मीरा गावठाण येथील स्टे इन लॉजिंग बोर्डिंगमध्ये वेश्याव्यवसाय प्रकरणी अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्ष यांनी कारवाई केली आहे. कारवाई करुन २ पीडित मुलींची सुटका केली आहे. विशेष म्हणजे हे लॉज अनधिकृत असल्यामुळे महापालिकेने काही महिन्यांपूर्वी पूर्णपणे जमीनदोस्त केले होते. त्यानंतर पुन्हा अनधिकृत बांधकाम करून लॉज सुरू करण्यात आले आहे. लॉज सुरू करत पुन्हा वेश्याव्यवसाय सुरू केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना माहिती मिळाली की, स्टे इन लॉजिंग आणि बोर्डिंगवर (लॅण्ड मार्क लॉजिंग), महाविष्णू मंदिराजवळ, मिरा गावठाण, काशिमिरा या लॉजिंगचे मॅनेजर व वेटर लॉजमध्ये येणाऱ्या पुरुष ग्राहकांना वेश्यागमनासाठी मुली पुरवत होते. मिळालेल्या माहितीनुसार पोलीस निरीक्षक समीर अहिरराव यांनी पोलीस पथकासह छापा टाकला. या कारवाईमध्ये स्टे इन लॉजचे वेटर बिरबलप्रसाद गुप्ता व वेटर इंद्रदेव यादव याने वेश्यागमनाच्या मोबदल्यात बोगस गिऱ्हाईकांना वेश्यागमनासाठी २ मुली पुरविल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना मुद्देमालासह ताब्यात घेऊन, २ पीडित मुलींची सुटका केली. तसेच स्टे इन लॉजिंग आणि बोर्डिंगचे मॅनेजर [illegible] शेट्टी, वेटर बिरबलप्रसाद गुप्ता, वेटर इंद्रदेव यादव व [illegible] असलेला आरोपी चालक/मालक यांच्याविरुद्ध काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे काशिमिरा येथील या लॉजवर महापालिकेने काही महिन्यांपूर्वी धडक कारवाई करून पूर्ण जमीनदोस्त केले होते. पुन्हा हे लॉजिंग बनवले असून त्यामध्ये आता देहव्यापार करताना आढळून आले आहे.

या लॉज [illegible]मालकांना नेमकं कोण एवढं अभय देऊन त्यांना विशि[illegible] रवाने व सोयीसुविधा पुरविल्या जातात. असे बेकायदेशी[illegible] व्यवसाय करत असताना त्यांच्यावर कायमस्वर[illegible] कारवाई का केली जात नाही, असा प्रश्न उपस्थित के[illegible] जात आहे.

शहरा[illegible]ल्या काही दिवसांपासून अवैध धंद्यांना उधाण आले आहे. पोलीस आपल्या परीने अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज आहे. मात्र [illegible] नागरिक या नात्याने आपल्या आजूबाजूला गैर प्रकार सुरू असल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन या [illegible] अनुषंगाने पोलिसांनी केले आहे.

दि. २२/१२/२२.

१३) पुढारी पान नं.०२.

## गांजाविक्री करणाऱ्याला अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरारोड - नयानगर पोलीस ठाणे हद्दीत गांजा विक्रीसाठी आलेल्या तरुणावर पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत एकाला अटक करण्यात आली आहे. या आरोपीकडून २ किलो ४०० ग्रॅम गांजा आढळून आला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

नयानगर भागात एक व्यक्ती गांजा विक्री करण्यासाठी येणार असल्याची पोलिसांना माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी नयानगर स्काय वाक परिसरात सापळा रचून एका व्यक्तीला ताब्यात घेतले. त्यावेळी चौकशी दरम्यान त्याने इम्तियाज अहमद नियाज अहमद कुरेशी असे नाव सांगितले. त्याची अंग झडती घेतली असता त्याच्याकडे दोन किलो चारशे ग्रॅम गांजा मिळून आला. त्याला अटक करून त्याच्या विरुद्ध एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गांजा विक्रीसाठी कोठून आणला होता व कोणाला विकणार होता याचा अधिक तपास नयानगर पोलीस करत आहेत.

१४) पुढारी मु. पान नं.०१.

## हुक्का पार्लरवर कारवाई

**मिरारोड :** नवघर पोलीस ठाणे हद्दीतील जैननगर परिसरात अनधिकृतपणे चालणाऱ्या हुक्का पार्लरवर नवघर पोलिसांनी कारवाई केली आहे. भाईंदर पूर्वेच्या जैननगर परिसरात अनधिकृत हुक्का पार्लर चालू असल्याची माहिती नवघर पोलिसांना मिळाली होती. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली त्या ठिकाणी पोलिसांनी छापा मारला असता हुक्का पॉट, शासनाने बंदी घातलेले हुक्क्याचे फ्लेवर, कोळसा अशाप्रकारे एकूण २५ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अनधिकृत हुक्का पार्लर चालवत असलेल्या व तंबाखूजन्य हुक्का विकत घेऊन ओढणारे इसम अशा एकूण ९ व्यक्तींना ताब्यात घेऊन त्यांच्यावर नवघर पोलीस ठाण्यात पोक्टा ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१५) पुण्यनगरी मु. पान नं.०१.

## डुक्कर पकडणारी टोळी आपसात भिडली

### घटनेचा थरार सीसीटीव्हीत कैद



**।वसई ।** वसईतील वालीव नाईक पाडा येथील पुन्हा एकदा डुक्कर पकडणारी शिकलकरमधील गँगवार उफाळून आले. दादू यांच्या जीपला जोरदार ठोकर मारून त्यांच्यावर वार करून तीन आरोपी पसार झाले. वालीवमधील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याचा थरार सीसीटीव्हीत कैद झाला आहे. या घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, पोलीस उपायुक्त सुहास बावचे, पोलीस निरीक्षक कैलास बर्वे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून, आरोपींच्या शोधासाठी पथके पाठवली आहेत.

दि. २२/१२/२२

(६) पुण्यनगरी पृ.क्र.नं.०७

# कर्जाच्या बहाण्याने फसवणूक करणाऱ्यास अटक

**मीरा रोड :** नवघर पोलीस ठाणे हद्दीत कर्ज काढून देण्याच्या बहाण्याने फसवणूक करणाऱ्या आरोपीस नवघर पोलिसांनी अटक केली असून, त्याच्याकडून ६५ हजार रोख व इतर मुद्देमाल जप्त केला आहे.

नवघर पोलीस ठाणे हद्दीमध्ये राहणारे जयेश जगजीवनदास मेहता (५६) यांना एका अनोळखी व्यक्तीचा फोन आला व मी एल अँण्ड टी फायनान्समधून बोलत आहे, तुम्हाला कर्जाची आवश्यकता आहे का? असे विचारले. मेहता यांना फायनान्सची आवश्यकता असल्याने त्यांनी त्यास होकार दिला. त्यानंतर फोनवरील व्यक्तीने फिर्यादी यांच्या ऑफिसमध्ये येऊन कर्जमंजुरीसाठी फिर्यादी यांच्याकडून त्यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड, बँक स्टेटमेंट व ३०० रुपये रकमेचे एल अँण्ड टी फायनान्स व हिरो हे नाव टाकून चार क्रॉस धनादेश घेतले होते. फिर्यादी यांना त्यांच्या फोनवर त्यांच्या बँक खात्यामधून १,४८,५०० रुपये डेबिट झाल्याचा मेसेज आला. त्या वेळी फिर्यादी यांनी बँकेत जाऊन विचारणा केली असता, फिर्यादी यांनी त्या अनोळखी व्यक्तीने कर्जासाठी दिलेले एल अँण्ड टी फायनान्स व हिरो या नावाने ३०० रुपयांचे क्रॉस धनादेश खोडून त्या धनादेशाद्वारे बँकेमधून १,४८,५०० रुपये इतकी रक्कम काढल्याची माहिती मिळाली. याबाबत नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास करताना आरोपीची गुन्हा करण्याच्या पद्धतीवरून मुंबई, ठाणे आदी परिसरात माहिती घेऊन आरोपीचा शोध घेत असताना गुन्हा करणारा आरोपी जिगर धीरजलाल कारेलिया याने केल्याचे निष्पन्न झाले. आरोपीला या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीकडून ६५ हजार रुपये रोख व फिर्यादी यांचे बँकेचे चेक बनावटीकरण करण्यासाठी वापरलेला इरेजर पेन तसेच फिर्यादी यांचे लोनसाठी घेतलेले कागदपत्र आदी मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच अटक आरोपी हा अशा प्रकारची फसवणूक करण्यात सराईत असून, त्याने या व्यतिरिक्त अनेक लोकांची फसवणूक केली आहे. त्याबाबतचा पुढील तपास नवघर पोलीस करत आहेत.